(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Peer-Reviewed & Refereed Indexed**


**Multidisciplinary International Research Journal**

## December-2021

ISSUE No- ( CCCXXIX ) 329-B

## WOMEN'S STATUS : PROBLEMS & SOLUTIONS



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr. Manita Kaur Virdi**
Head, Department
of Political Science
Govt College Bichhuva
Chhindwara Madhya Pradesh

**Editor:**
**Dr.Baliram Vasantrao Pawar**
Head, Department of Sociology
Mahatma Phule College Kingaon
Tq.Ahmebpur
Dist.Latur Maharashtra

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## December-2021

**ISSUE No- ( CCCXXIX ) 329- B**

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Manita Kaur Virdi**
Editor
Head, Department of Political Science
Govt College Bichhuva Chhindwara Madhya Pradesh

**Dr.Baliram Vasantrao Pawar**
Editor
Head, Department of Sociology
Mahatma Phule College Kingaon Tq.Ahmebpur Dist.Latur Maharashtra

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

**© All rights reserved with the authors & publisher**

| | | |
|---|---|---|
| 20 | हिंदू कोड बिल : महिला सक्षमीकरणासाठी एक प्रामाणिक उपक्रम<br>डॉ. सोमा पी. गोंडाणे | 100 |
| 21 | वर्तमान में पंडो जनजाति में महिलाओं की स्थिति का अध्ययन छत्तीसगढ़ राज्य के कोरिया जिले के संकरपुर ग्राम पंचायत के विशेष सन्दर्भ में।<br>बिक्की राम | 105 |
| 22 | नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या शैक्षणिक व आरोग्य सुविधांचा चिकित्सक अभ्यासविशेष संदर्भ— पश्चिम महाराष्ट्रातील 'क' वर्ग नगरपरिषदा डॉ. किशोर गिरीश नवले / तृप्ती उमेशचंद्र लाहोटी | 110 |
| 23 | समकालीन समाज व्यवस्थेत मानवी जीवनमूल्यांची उपयोगिता सांगणारा जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज प्रा. डॉ. पी. आर. जाधव | 115 |
| 24 | पायाभूत सुविधांच्या आभावामुळे आदीवासी स्त्रींयांची स्थीती<br>पाटील स्वाती विजय / डॉ.अकोशगीर दत्तुगीर गोस्वामी | 119 |
| 25 | परित्यक्ता स्त्रियांच्या समस्या प्रा.दत्तात्रय प्रभुराव मुंढे | 124 |

# समकालीन समाज व्यवस्थेत मानवी जीवनमूल्यांची उपयोगिता सांगणारा जगद्गुरू संत तुकाराम महाराज

प्रा. डॉ. पी. आर. जाधव
स्व. दत्तात्रेय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती

**प्रस्तावना :**

आज मानवाच्या सुखाला, विकासाला आणि प्रगतीला खिळ लागली असेल त्याला सर्वात मोठी कारणीभूत गोष्ट कोणती असेल? मानवी जीवनातील सर्वात मोठी अधोगती काय असेल? ते म्हणजे त्यांचा स्वार्थीपणा अथवा मतलबीपणा हा आहे. तसेच संपूर्ण जगात ठराविकपणे लूटमार, जाळपोळ, भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, बलात्कार, दारिद्र्य, आत्महत्या या सारख्या भयानक घटना घडताना दिसत आहे. केवळ एका शुल्लक स्वार्थापायी एकमेकांच्या संपत्तीवर वाईट नजर ठेवणे होय. यामध्येच वादाचे व भांडणाचे कारण दडलेले आहे. आज प्रत्येक माणूस हा माणसावर संशयी नजरेने आणि अविश्वासाने बघतो आहे. भांडणाचे मूळ काढून वाद घालतो आहे. त्यामुळे तो एकमेकांपासून दूर चालला आहे आणि या मानवाच्या मुख्य स्वार्थामधून त्याच्या एकूणच अनार्थाला सुरुवात झाली आहे. माणसाच्या या वैगुण्याबद्दल बहिणाबाई चौधरी म्हणतात-

"मानसा मानसा
कधी व्हशील माणूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस"

माणसांमध्ये माणुसकी व सच्चा माणूस म्हणून केव्हा निर्माण होईल असा सवाल बहिणाबाई करतात. मानवाने स्वार्थी असावे परंतु त्याचा अतिरेके न करता स्वार्थाचा कौशल्यपूर्वक अंगिकार करून परमार्थ साधला पाहिजे, केवळ आणि केवळ मानवाने स्वार्थ चुकीच्या पध्दतीने साधल्या गेला तर किंवा मीच सुखी कसा होणार, हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवला आणि त्यासाठी दुसऱ्याचे कितीही नुकसान झाले तरी त्याचे मला काही देणे-घेणे नाही ही वृत्ती मानवाच्या उत्कर्षाला मारक ठरत आहे.

मानावाचा वाढत चाललेला अतिरेकी स्वार्थ योग्य आहे की अयोग्य आहे यावर विचार करण्याची आज गरज आहे. आपण काय करतो, कसे करतो, त्याचा परिणाम काय होतो? यावर प्रत्येक मानवांनी विचार, आत्मपरीक्षण, चिंतन मंथन करण्याची काळाची गरज आहे. हे जग म्हणजे एक आरसाच आहे. आपली बऱ्या-वाईट प्रतिकृती त्या आरस्यामध्ये दिसते. त्या-त्या बऱ्या-वाईट घटनांवरून जी प्रतिक्रिया उमटते त्यावरून पुढील कृती उमटलेली दिसत राहते. रामायण आणि महाभारतामध्ये ज्या-ज्या कृती चित्रित केल्यात त्यातून पुढील प्रसंग चित्रित केल्या गेलीत.

नैतिकतेचे धडे व नीतिमूल्यांचे पाढे ज्या महापुरुषांनी सांगितली आहेत अशी समृद्ध परंपरा भारतीय संस्कृतीला लाभली आहे. त्यामध्ये प्रभू रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, ऋषींची परंपरा, संतांची परंपरा, विचारवंतांची परंपरा, आदर्श राजांची परंपरा लाभली आहे. "भारतीय संस्कृतीमध्ये एकेक सद्गुणासाठी, एकेका ध्येयासाठी, सर्वस्वाचे समर्पण करणाऱ्या महान विभूती आपणास दिसतात"[१] असे युवा पिढीला भारतीय नीतिमूल्यांचा परिचय 'ध्येयांची पराकाष्ठा' या पाठामधून साने गुरुजी करून देतात. चांगले कार्य व चांगली स्वार्थानुभूती साधायचा उत्तम उपाय म्हणजे एकमेकांना निस्वार्थपणे सहकार्य करणे होय, याविषयी वैराग्याचे खरे सार सांगताना संत तुकाराम महाराज म्हणतात. –

"जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेच करी ।।धृ।।
उत्तम चि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।१।।"

संत तुकारामांच्या मते आज मानवी समाजात नैतिक जीवनमूल्यांची खूप मोठी गरज आहे असे ते अधिकार वाणीने सत्य सांगतात. मानवाने उत्तम व्यवहार व व्यापार करून धनदौलत मिळविली पाहिजे आणि निस्वार्थ भावनेनी ती स्वतःसाठी व समाजासाठी खर्च केली पाहिजे. यामध्ये ते मानवाला मोक्ष प्राप्तीचा आनंद मानतात. तुकोबांच्या मते मानवी मन शुद्ध व निष्पापी असेल तर जीवनातील अशुभ कार्ये शुभ होतात याविषयी तुकोबा म्हणतात.-

"चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ।।धृ।।
विष ते अमृत आघात ते हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ।।१।।"

तुकोबांच्या चित्तशुद्धीबद्दल डॉ. एस. एस. कानडजे म्हणतात – "तुकोबाचा निर्मळ स्नेहभाव हा चित्तशुद्धीचा पाया आणि बंध मुक्तीचा मूलाधार आहे. पण त्यासाठी कलदार आत्मप्रत्यय हवा आहे. चित्तशुद्धी ही मनोकायीक व्याधींना पायबंद घालते. म्हणून चित्तशुद्धीचा पुरस्कार केला."[२] माणसाच्या अंतकरणात सर्वांप्रती सद्भावना असेल आणि त्याने मन स्वच्छ व शुद्ध असेल तर शत्रूपक्षही मित्र होतात इतकेच नव्हे तर हिंस्र गणल्या गेलेले वाघ, सापसुद्धा निर्मळवृत्तीच्या मानसाला स्पर्श करणार नाही असा ठाम विश्वास तुकोबा व्यक्त करतात. तुकोबा दयेबद्दल जाणिव व्यक्त करताना म्हणतात-

"दया तिचे नाव भूतांचे पाळण । आणीक निर्दळण कंटकांचे ।।१।।
पाप त्याचे नाव न विचारीत नीत । भलते चि उन्मत्त करी सदा ।।२।।"

तुकोबांच्या मते - जगातील सर्व प्राणी व राव यांना समान वागविणे, सर्वांप्रती दयाबुद्धी ठेवावी आणि दुष्टदुर्जनांना कठोर शिक्षा करणे म्हणजे हीच खरी दया आहे. असे स्पष्ट व्यक्त करतात. मध्ययुगीन महाराष्ट्रात मुसलमानी राजवटीने व त्यांच्या अमानुष अत्याचारामुळे येथील मानवी जीवन कोलमडून गेलेत त्यामुळे महाराष्ट्रीय संतांनी समाजाला जागे करण्याचे, बुडणाऱ्यांना तारण्याचे कार्य केले. याविषयी डॉ. स. रा. गाळगीळ म्हणतात. - "सर्व मूढ धर्म कल्पनांमधून समाजाला मुक्त करून सर्वांना सुलभ, सहज प्राप्त अशा शुद्ध भक्तिमार्गावर महत्त्वाचे आणून सोडले हे पहिले महत्वाचे कार्य संतांनी महाराष्ट्रात केले."[३]

तुकोबांच्या मते ईश्वराच्या भक्तीत आड येणारे आपली धनसंपत्ती, देहासक्ती, जीवनासक्ती आणि वर्णासक्तीचा ते निषेध करतात. 'मी आणि माझे' ह्या भ्रमाचा निरास करावा. माणसाचे संसारातील वागणे व जगणे हे सदाचारी असावे ह्याविषयी ते मनाला आदेश देतात -

"मना करा रे प्रसन्न ।
सर्व सिद्धीचे कारण ।
मोक्ष अथवा बंधन ।
सुखसमाधान ईच्छा ते ।।१।।"

तुकोबांच्या मते मानवाने आपापल्या मनावर अंकुश ठेवावा. परमेश्वराच्या भक्तीसाठी प्रत्येकामध्ये एकांत असावा या एकांतामधून मानवाला सुखसमाधान प्राप्त होते असे ठामपणे तुकोबा मानवाला सूचित करतात.

तुकोबा स्वतः आत्मसाक्षात्काराने सांगतात धर्म रक्षणाची जबाबदारी परमेश्वराने संपूर्ण मानव जातीवर टाकली आहे. असा त्यांचा दृढविश्वास होता. त्यामुळे त्यांनी आत्मानिर्धाराने समाजाच्या उद्धाराचे आव्हान स्वीकारले. त्यांनी निद्रिस्त व मृतप्राय समाजाला आपल्या अभंगाच्या माध्यमातून जागे करण्याचा प्रयत्न केला. या

त्यांच्या समाज कार्याविषयी डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात - "तुकारामासमोर वहुता छंदाचे बहुजन होते. त्यांना त्यांच्या अधिकाराप्रमाणे मार्गास लावण्याचे काम त्यांनी तत्परतेने केले"४

तुकोबांच्या मते जे संसाराने तापले, गांजले, अडले, नाडले गेले त्यांना आपले म्हणून त्यांचे सांत्वन केले, त्यांना दिलासा दिला, त्यांना मायेची उब दिली अशावद्दल कृतज्ञता व्यक्त करताना तुकोवा म्हणतात.

"दया करणे जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी ।।५।।
तुका म्हणे सांगू किती। तोचि भगवंताची मूर्ती ।।६।।"

दीन - दुबळयांच्या सेवेतच भगवंताची मूर्ती तुकोबांना दिसली आहे. तुकोबाच्या मते मानवी मन खूप चंचल आहे. या मनानेच माणसाच्या मागे बारा वाट लावल्यात. या मनाला प्रसन्न ठेवले त्याचे विकार नष्ट केले तर मनाशिवाय दुसरे दैवत नाही मानवी संसारातील सुख बघितले तर दुःख अधिक सुख फारच कमी आहे. याविषयी तुकोबा म्हणतात.

"सुख पाहतां जवापाडे । दुःख पर्वताएवढे ।।११।।
धरी धरी आठवण । मानी संतांचे वचन ।।२।।"

माणसाच्या जीवनात सुख बघितले तर जवा येवढे आणि दुःख पर्वताइतके आहे. अशी संसाराची स्थिती तुकोबा व्यक्त करतात, खऱ्या अर्थाने मानवाला तुकोवा त्यांच्या वास्तव जगण्याची जाणीव करून देतात. तुकोबा शुद्ध बीजाबद्दल मानवाला त्याची महती व त्याच्या उत्तम फळावद्दल दाखला देताना म्हणतात.

"शुद्ध बीजा पोटी। फळे रसाळ गोमटी ।।१।।
मुखी अमृताची वाणी । देह देवाचे कारणी ।।२।।"

तुकोबाच्या मते वियाणे शुद्ध, चांगले, दाणेदार असेल तर त्याच्या पोटी फळेही रसाळ आणि सुरेख येतात. याच न्यायाने माणसाने जर नेहमी तोंडी अमृतासारखी वाणी ठेवली आणि देह देवकारणी लाविला तर अशक्य गोष्टी शक्य होतात. हा ठाम आशावाद तुकोबा व्यक्त करतात. सर्व मानव जात ही एक ईश्वराची लेकरे आहेत याविषयी तुकोवा म्हणतात.

"विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।१।।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचे ।।३।।"

तुकोबाच्या मते सर्व जग हे विष्णुमय आहे. यामध्ये भेदाभेद करणे हे अमंगळ आहे. हा भ्रमिष्टपणा आहे. त्यामध्ये एकमेकांची फसवणूक सुरु आहे. त्यामुळे सगळे सारखे विष्णूसमान आहे. म्हणून कोणाचाच मत्सर व व्देष न करता सर्वेश्वराच्या पूजनाचे रहस्य एकात्म भावातच तुकोबांनी सांगितले आहे. तुकोबा स्वतःच्या मृदू व कठोर स्वभावावद्दल आपला प्रखड सवाल व्यक्त करताना म्हणतात.

"मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदू ऐसे ।।१।।
भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊ माथा ।।३।।

तुकोबा म्हणतात आम्ही विष्णूचे भक्त आहोत, आमचा स्वभाव मेणाहून मऊ आहे. इतकेच नव्हे तर दगडालाही भेदून आम्ही बाहेर पडणार एवढे कठीण आहोत. आम्ही एवढे उदार आहोत की एकवेळ सज्जनाला आमच्या कंबरेची वस्त्रे देवू परंतु एखादा नाठाळ करंटी जर भेटला तर त्याच्या डोक्यात काठी घालू असा नाठाळाविषयी तुकोवा उद्वेग व्यक्त करतात. तुकोबाच्या मते मानवी जीवन हे नश्वर आहे. या जीवनामध्ये मानवाने कोण्याही जीवाला शक्योतर न दुखवता माफक आनंद घेतला पाहिजे. याविषयी तुकोवा म्हणतात.

"एक रे मना । तुझ्या स्वहिताच्या खुणा ।
ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळाही अधिकार ।

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 329 (CCCXXIX) B
ISSN : 2278-9308
December, 2021

वाळे नरी नर। आदिकरोनी वेश्याहि ।।५।।"

तुकोवा मानवाला त्याच्या स्वहिताच्या खुणा सांगताना म्हणतात की सर्व भक्ती व सुखाचे आगार म्हणजे पंढरीचा पांडुरंग आहे. त्याचे मनन, चिंतन आणि ध्यान, धारणा करण्याने मानवाला समाधान प्राप्त होते. परमेश्वराची भक्ती व दर्शन घेण्याचा अधिकार समाजातील सर्व ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, स्त्रीया आणि मुलेबाळांना या सर्वांना आहे हा ठाम आत्मविश्वास तुकोवा प्रकट करतात. तुकोवाच्या जीवनाचे खरे ध्येय व उद्देश समाजातील रंजल्या गांजल्या सेवेतच होते हे त्यांच्या एका अभंगातून मांडलेली तळमळ प्रकट होते.

"जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा ।।"

वरील अभंगावर आपली प्रतिक्रिया देताना डॉ. किशोर सानप म्हणतात - "तुकोबांचे अंतःकरण म्हणजे करुणेचा भव्य सागरच. सर्व प्राणिमात्रामध्ये देवाचा संचार असतो. रंजल्या गांजल्याना जवळ करणे ही देवाची भक्तीच आहे. हा अभंग तुकोबांनी आपल्या अनुभवातून लिहिला आहे." [५]

अशाप्रकारे आजच्या समकालीन व्यवस्थेत तुकोबांनी तत्कालीन काळात सांगितलेली मानवी जीवन मूल्यांची आजही किती अनिवार्यता आहे हे जगद्गुरू तुकोबारायांच्या वरील अभंगातून मांडलेले आहे.

आधारभूत संदर्भ ग्रंथ -

१) मृदगंध भाग - १ संपादक - प्राचार्य गजानन जाधव - राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्युटर्स - नागपूर प्रथम आवृत्ती - २०१७ - पृष्ठ क्र. - ९.
२) कानडजे डॉ. एस. एम. 'नित्य नवा दिस' पैलू प्रकाशन - आवृत्ती पहिली २८ जून २०१७ - पृष्ठ क्र. - ९.
३) 'तुकाराम : काही कवडसे -----' चेतश्री प्रकाशन अमळनेर ४२५४०१ जि. जळगाव - पथमावृत्ती - २६ ऑगस्ट १९९८ पृष्ठ क्र. - ६५.
४) तत्रैव - 'तुकाराम : काही कवडसे -----' चेतश्री प्रकाशन अमळनेर ४२५४०१ जि. जळगाव - पथमावृत्ती - २६ ऑगस्ट १९९८ पृष्ठ क्र. - ६६.
५) डॉ. सानप किशोर ' युगपुरुप तुकाराम' प्रकाशक - लोकवाहम गृह - ८५ सयानी रोड, प्रभादेवी मुंबई २५ - पृष्ठ क्र. - १७ आवृत्ती सातवी एप्रिल २०१६.